## नियमित दिवाणी मुकदमा क्र.१३३/१९८४ मधील नि.क्र.१८१ वरील आदेश

प्रस्तुतचा दावा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२—इ याने प्रतिवादी क्र.२—ड४ हिची योग्य वारस म्हणून राजश्री राजाराम धुरी हिस दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामिल करणेबाबत आदेश होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्जातील सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रस्तुतकामी २—ड ही मयत असून, तिचे वारस अभिलेखावर वादींनी आणलेले आहेत. परंतु सदर प्रतिवादीची वारस सुशीला दिगंबर धुरी ही नसून, चुकीच्या व्यक्तीला वारस म्हणून प्रतिवादी क्र.२—ड४ असे सामिल करण्यात आलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.२—ड४ हिचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला असून, तो रद्द होण्यास पात्र आहे. सबब प्रतिवादी क्र.२—ड४ सुशीला दिगंबर धुरी हिच्या ऐवजी प्रतिवादी क्र.२—ड४ म्हणून राजश्री राजाराम धुरी हिस दाव्याचेकामी पक्षकार म्हणून सामिल करण्याबाबत योग्यतो आदेश व्हावा. इत्यादी बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती सदर प्रतिवादींनी केलेली आहे.

०३. वादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन आक्षेप नोंदविला आहे. वादींचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.२—ड४ हिस दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्र.२—ड च्या वारसांबाबत वादींना जी माहिती उपलब्ध झाली त्यानुसार सुशीला दिगंबर धुरी हिस प्रस्तुतकामी सामिल करण्यात आले आहे. प्रस्तुत अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिवादी क्र.२—इ याने पुरावा दाखल करणे आवश्यक आहे. इत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

०४. उभयपक्षकारातर्फे संपुर्ण युक्तीवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले. निशाणी १६८ ते १७० वरील दिनांक १८/१२/२०१५ रोजीच्या संयुक्तिक आदेशानुसार प्रतिवादी क्र.२—ड४ म्हणून सुशील दिगंबर धुरी हिस प्रतिवादी क्र.२—ड चे अन्य वारसांसोबत सामिल करणेचा माझया पूर्वाधिका—यांनी आदेश पारीत केलेला आहे. ही अभिलेखावरील बाब आहे की, सदरील तिन्ही अर्जावर प्रतिवादींनी आपली कोणतीही हरकत घेतलेली नव्हती. त्यावेळी प्रतिवादींनी प्रतिवादी क्र.२—ड४ हिच्या नांवाबाबत कोणतीही तक्रार उपस्थित केली नाही असे दिसते. सदर अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिवादी क्र.२—इ याने प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. शिवाय नि.क्र.१७५ वरील वारस समन्स अहवाल पहाता; प्रतिवादी क्र.२—ड४ हिस समन्स/नोटीस दि.०४/०३/२०१६ रोजी बजावणी करण्यात

आली असल्याचा अहवाल या न्यायालयास प्राप्त झालेला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२—ड४ हिचे नांव वादींनी चुकीचे नमूद केले आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचता येत नाही. सद्य स्थितीत अर्जात कोणतेही तथ्य आढळत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतोः—

—:—**आ दे श**—:—

०१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/—
( आर. आर. काळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
सावंतवाडी.

स्थळः— सावंतवाडी.
दिनांकः— ११/०१/२०१७